जिल्हा परिषद जालनाचे मुखपत्र

# ग्राम स्वराज्य

gramswarajyazpjalna@gmail.com

अंक पहिला | पाने ४ | दि.३१|०३|२०१५ | खाजगी वितरण

**सहयोग आणि लेखन:** युनिसेफ, मुंबई व सर्व शिक्षा अभियान, जालना

# बालविवाह प्रतिबंध कार्यप्रणाली

सक्षम यंत्रणा कोणती? कोणती यंत्रणा काय भूमिका घेणार? कोणती यंत्रणा काय नमुने वापरणार ? याचा समावेश या कार्य-प्रणालीत आहे



## बालविवाह प्रतिबंध संकल्पना

बालविवाह ही आपल्या समाजात प्रचलित असलेल्या अनेक अनिष्ट प्रथांपैकी एक गंभीर समस्या आहे सतीची चाल, केशवपन, विधवा पुनर्विवाह-बंदी या आणि अशा अनेक चालत आलेल्या स्त्री-पुरुष विषमतेवर आधारित आणि पुरुष प्रधान संस्कृतीचे लक्षण असलेलीच ती एक आजतागायत टिकून राहिलेली अनिष्ट प्रथा आहे.

बालविवाहाची समस्या ही लिंगभेदावर आधारित समाजरचना, जातीव्यवस्था, पारंपरिक रूढी, स्थलांतरित कामगार, शाळाबाह्य मुलींचे चिंताजनक प्रमाण, बालविवाह प्रतिबंधक कायद्या बाबतचे अज्ञान आणि आरोग्य-शिक्षणा बाबतची जनमानसातील उदासीनता, गाव पातळीपासून ते जिल्हा स्तरावरील वेगवेगळ्या अंमलबजावणी यंत्रणा यांमध्ये असलेली या विषया बाबतची समज, अंतर्गत संवाद आणि समन्वयाचा अभाव या सर्व बाबीं या विषयाच्या मुळाशी कारणीभूत आहेत.

स्वातंत्र्य, समता,बंधुत्व, न्याय आणि धर्म निरपेक्षता या मूल्यांवर आधारित भारतीय संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाला सन्मानाने आयुष्य जगण्यासाठी अन्न ,वस्त्र ,निवारा आरोग्य ,आणि शिक्षण यासारखे मुलभूत मानवी अधिकार बहाल केले आहेत.

तद्वतच १९८९ साली झालेल्या बाल हक्क संहितेने बालकांच्या मुलभूत अधिकारांचे रक्षण करण्याच्या हेतूने जागतिक स्तरावर बालकांना सन्मानाने जगण्याचा, विकासाचा, शोषणा पासून संरक्षणाचा आणि सहभागीतेचा अधिकार अबाधित राहावा यासाठी ५४ कलमी संहिता बहाल केली आहे.. आपला भारत देश ही त्याला बांधील आहे.

बालविवाहाला बळी पडलेल्या व्यक्तीच्या या सर्वच मुलभूत मानवी अधिकाराचे उल्लंघन तर होतेच शिवाय बालपणीच संसाराच्या गाड्याला जुंपून त्या बालकांचे बालपण हिरावून घेतलं जात. कमी वयात गर्भारपण लादल्या गेल्यामुळे आरोग्याशी निगडीत गंभीर समस्यांना त्या बालमातांना सामोरे जावे लागते.

आपल्या जालना जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण लक्षणीय आहे.

आपल्याला बालविवाहाचे आपल्या जिल्ह्यातील प्रमाण कमी करायचे असेल तर आपणाला विविध यंत्रणाचे एकत्रित प्रयत्न आवश्यक आहेत. त्याच अनुषंगाने जालना जिल्ह्यात शून्य बालविवाह करण्याच्या दृष्टीने आपल्याला विविध यंत्रणांचा एक सकारात्मक संवाद व्हावा,विषयाबाबतची आपली समज वाढावी आणि प्रत्येकाने या विषयातले आपले योगदान ओळखून आपापल्या परीने सर्वोतोपरी प्रयत्न करावेत, जेणे करून आपल्याला आपणासमोर असलेले शून्य बालविवाहाचे ध्येय गाठता येईल.

## बालविवाह प्रतिबंध कार्य प्रणाली

**आपल्या गावात / शहरात कोणती कुटुंब/मुली अशा आहेत ज्याच्या घरात बालविवाह होण्याची शक्यता आहे**

- शाळेत अनियमित / शिक्षण अर्धवट सोडलेल्या आणि नापास झालेल्या मुली
- स्थलांतरित कुटुंबातील मुली
- वयात येणारी मुले / मुली
- घरातील कमावति व्यक्ती मृत्यू पावल्यास
- जास्त मुली असणारी कुटुंब
- गरीब घरातील मुली
- मुलींची जबाबदारी टाळणारी कुटुंब
- कर्जबाजारी कुटुंबातील मुलगी
- व्यसनी कुटुंबातील मुलगी
- एखादी अत्याचारग्रस्त मुलगी
- प्रेमात गुंतलेली मुलगी
- सामाजिक परंपरा /रुढी / च्या प्रभावामुळे होणारी लग्न
- असुरक्षित वातावरण असल्यामुळे होणारी लग्न
- दुर्लक्षित मुलींची कुटुंब / निराधार मुलीं
- वस्तीतील मुलीसोबत एखादी घटना (एखाद्या मुलीसोबत लैंगिक शोषणाची घटना अथवा एखादी मुलगी प्रेमविवाहात निघून गेली असल्यास ) अशा घटनेवरून वस्तीत /गावात भीतीपोटी इतर मुलींची लग्न व सर्व मुलींच्या कुटुंबियांकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे.

**बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून दिनांक ३ जून २०१३ च्या अधिसूचनेनुसार ग्राम सेवक यांच्याकडे बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे आणि त्यांना साहाय्य करण्यासाठी अंगणवाडी ताई एक महत्वपूर्ण अधिकारी आहे.**

**बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून विवाह पूर्व आणि विवाहनंतर बळीत मुलीच्या वतीनं हस्तक्षेप करण्याचा तुम्हाला कायद्याने पूर्णपणे अधिकार आहे. कलम १६ (३) नुसार ही कार्यवाही करता येते.**

आपल्या गावात / शहरात कोणती कुटुंब/मुली अशा आहेत ज्याच्या घरात बालविवाह होण्याची शक्यता आहे अशा कुटुंबासोबत कोण काय भूमिका घेऊन काम करण्याची गरज आहे.

### संपादकीय

## शक्य आहे बालविवाह रोखणं!!!

आपल्या जालना जिल्ह्यात बालविवाह होत आहेत यावर पटकन कुणाचा विश्वास बसणार नाही, पण हे जळजळीत वास्तव आहे. जिल्हा प्रशासन म्हणून आम्ही बालविवाह होऊ नयेत म्हणून जिल्हा आणि तालुका स्तरावर आपल्या सर्वांच्या सहकार्याने भूमिका घेत आहोत.

खरं तर बालविवाह होऊ नये अशी आपल्या सर्वांची प्रबळ इच्छा आहे. मात्र वास्तव वेगळ आहे. न कळत्या वयात लग्न झाल्याने खरंतर त्या अजाण मुलीचीच फरफट अधिक होते. लहान वयात लग्न म्हणजे शाळेपासून फारकत आणि त्या मुळे संपूर्ण जीवनात स्वत:च्या विकासाची आणि संधीची सर्व दारे आपोआपच बंद होऊन जातात. आरोग्याच्या तक्रारी डोकं वर काढतात. त्यातूनच गर्भ धारणा झाली तर सर्व दुष्टचक्र सुरु होते परिणामी आपल्या स्वत:च्या मुलीला आपण स्वत:हूनच मरणाच्या दारी पोहचवत आहोत. बालमाता मृत्यू, बाल मृत्यू, कुपोषण, सारखे आजारपण या मुळे मुलींचा आत्मविश्वास कमी कमी होत जातो. जगण्याची उमेद कमी होते. आम्हाला वाटते हे दुष्टचक्र आपण सर्व जण मिळून रोखू शकतो.

आपल्या मुलींना विकासाच्या संधी मिळाल्या पाहिजेत. विकासाच्या संधी मिळवण्यासाठी आजघडीला शिक्षण हे प्रभावी माध्यम आहे. आपल्या मुलींची मानसिक, शारीरिक निकोप वाढ होऊ देणं हे आपल्या सर्वांचं कर्तव्य आहे. शिक्षण आणि त्या सोबत आपल्या मोठ्या माणसांचा सक्रीय पाठिंबा या गोष्टी आपल्या मुलींपर्यंत आपण पोहचवल्यात की बघा आपल्या मुलींसाठी किती संधी उपलब्ध होतील...त्यांच्या साठी विकासाच्या नव्या कल्पना समोर येतील त्यातून हे बालविवाहाचे दुष्टचक्र आपल्या सर्वांना भेदता येईल...

या बालविवाहाच्या 'ग्राम स्वराज्य' या नियतकालिकाच्या विशेष अंकाद्वारे आम्ही आपल्याला हे निक्षून सांगू इच्छितो की, बालविवाह होऊ देणे/ करणे/करण्यास सहकार्य करणे हा कायद्याने गुन्हा आहे. आपल्या जिल्ह्यात बालविवाह होण्याचे प्रमाण शून्यावर येण्यासाठी आपण सर्वांनीच आतापासून जोरदार तयारी करायला हवी. कायदा व जिल्हा प्रशासन आपल्या सोबत आहे, आपल्या जिल्ह्यात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था आपल्या सोबत आहेत. आपण सर्व जण मिळून प्रयत्न करूयात. बालविवाह रोखण्याबाबत आपल्या सर्वांना कुणाची काय भूमिका आहे. काय कार्य प्रणाली आपण वापरात आणू शकतो या बाबतची कार्य प्रणाली आम्ही युनिसेफ च्या सहकार्याने तयार केली आहे. निश्चितच या कार्यप्रणालीचा आपल्या सर्वांना या कामी उपयोग होईल अशी आशा आम्ही व्यक्त करतो. आज पासूनच आपण या बालविवाह रोखण्याच्या मोहिमेत सहभागी होऊयात...

## ग्रामसेवक

ग्रामसभेत किंवा महिला ग्राम सभेत याविषयी चर्चा घडवून गावात बालविवाह होणार नाहीत यासाठी ठराव पास करून घेणे आणि ग्रामसभा आणि इतर जनजागृतीच्या माध्यमातून बालविवाह प्रतिबंध कायद्याचा प्रसार व प्रचार करणे.

अशा मुलींच्या वयाच्या नोंदी नीट तपासून घेणे तसेच अशा कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे.

शाळा व्यवस्थापन समितीला सर्वोतोपरी सहकार्य करणे तसचं गाव बाल संरक्षण समिती सोबत संवाद आणि बाल संरक्षण मुद्याविषयी सहकार्य घेणे आणि गावातील मुलांसाठी विशेष प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी नियोजन करणे.

एखाद्या कुटुंबात बालविवाहाची खबर मिळाल्यावर ग्राम पंचायत समिती सदस्यांच्या सहकार्याने कुटुंबाशी सामंजस्याने संवाद साधून बालविवाह होणार नाही याची दक्षता घेणे. सदर कुटुंबाला ग्रामपंचायत कार्यालयामार्फत रीतसर लेखी नोटीस देऊन समज देणे.

एवढे प्रयत्न करूनही कुटुंबाने बालविवाहाचा विचार बदललेला नसल्यास सदर कुटुंबाच्या विरोधात रीतसर लेखी तक्रार स्थानिक पोलिसांकडे दाखल करणे.

लग्न होत असल्याची किंवा ठरत असल्याची माहिती मिळाल्यावर आपण बालविवाह प्रतिबंध अधिकारी असल्याने भूमिका घेऊन कार्यवाही करणे बंधनकारक आहे. आपण आपली भूमिका नाकारू शकत नाही. आपल्याला मिळालेल्या माहितीवर आधारित तक्रार आपण नोंदवून घेणे बंधनकारक आहे.

## अंगणवाडी ताई

अशा कुटुंबाना नियमित भेटी देऊन विचारपूस/ संवाद करून त्यांना किशोर वयीन गटात सामील करून घेण्यास प्रवृत्त करणे. तसेच किशोरवयीन मुलींच्या दैनंदिन व्यवहारावर नियमित देखरेख व त्यांची माहिती ठेवतील. खासकरून नापास झालेल्या, गतिमंद, मतीमंद, शाळाबाह्य ,अनाथ व निराधार मुलींवर विशेष लक्ष केंद्रित करणे.

मासिक पाळी सुरु झालेल्या मुलींवर विशेष लक्ष देणे आणि वयात येणाऱ्या मुलींसाठी जीवन कौशल्य वर आधारित प्रशिक्षण आयोजित करणे आणि अशा मुलींशी वेळोवेळी चर्चा करून त्यांची बालविवाह विरोधी मानसिकता तयार करणे

बालविवाहाची घटना घडत किंवा ठरत असल्याची माहिती समोर आल्यास/ एखाद्या कुटुंबात बालविवाहाची बोलणी सुरु असल्यास ग्रामपंचायत स्तरावर माहिती देणे आणि गरज भासल्यास मुलीच्या वयाची नोंद असल्याचा वयाचा पुरावा संबधित यंत्रणांना देणे, आणि त्यावर प्रतिबंधात्मक कार्यवाही करणे.

विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रौढ महिलांसोबत चर्चा करत असता बालविवाह आणि त्याचे परिणाम या बद्दल चर्चा घडवून आणणे.

हे लक्षात असू द्या....

**बालविवाह ही अनिष्ट प्रथा आहे आणि कायदेशीर गुन्हा आहे**

## गाव बाल संरक्षण समिती

गाव बाल संरक्षण समिती अशा मुलांची यादी तयार करील

गाव बाल संरक्षणाच्या बैठकीत या विषयावर चर्चा घडवून आणून गाव बाल संरक्षण समितीच्या बैठकीत या विषयाचा पाठपूरावा करणे.

बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यास बालविवाह रोखण्यास सर्वोतोपरी मदत करील.

## पोलिस

पोलिसांनी तक्रारीची गांभिर्याने दखल घेऊन कार्यवाही सुरु करावी आणि एफ.आय.आर. दाखल करून पुरावे गोळा करावेत यासाठी गावातील बालविवाह प्रतिबंधक अधिकारी आणि गाव बाल संरक्षण समिती यांची मदत घ्यावी.

लक्षात असू द्यात बालविवाह हा अजामीन पात्र गुन्हा आहे

बालविवाह प्रतिबंधक सहाय्यक अधिकारी म्हणून अंगणवाडी ताईची मदत घ्यावी.

मुलींसोबत संवाद साधतांना महिलांची मदत घ्यावी.

विशेष बाल पोलिस अधिकारी यांची या कामी महत्वाची भूमिका आहे.

## शिक्षक

शिक्षक अशा मुलींवर देखरेख ठेऊ शकतात आणि अभ्यासातून मुलांना बालविवाहाच्या परिणामांची माहिती देऊ शकतात.

एखाद्या मुलीची शाळेतील अनियमितता ही कदाचीत बालविवाहाची नांदी असू शकते

अशा मुलींच्या कुटुंबियांना भेट देऊन बालविवाहापासून परावृत्त करून गरज वाटल्यास पोलीसांची किंवा बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याची किंवा गाव बाल संरक्षण समितीची मदत घेणे

वर्गात अशा मुलींबाबत इतर मुलींना मदती साठी तयार करावे

शाळेत बालविवाह या विषयावर निबंध/ चित्रकला/चर्चासत्र नियमित घ्यावीत.

शिक्षणाचा अधिकार
सर्व शिक्षा अभियान
सारे शिकूया, पुढे जाऊया

# बालविवाह ठरत अथवा होत असल्याचे कळल्यास कशा प्रकारे आपल्याला कार्यवाही करता येईल

### बालविवाह पूर्व

- दोन्ही कुटुंबियांची भेट घेऊन बालविवाह हा एक दंडनीय अपराध आहे याची जाणीव करून देणे.
- बालविवाह न करण्याबाबत प्रवृत्त करणे
- समाजातील प्रतिष्ठीत व्यक्ती/ नातेवाईक/शिक्षक/लोकसेवक/बाल कल्याण समिती/ स्थानिक स्वयंसेवी संस्था यांच्या सहयोगाने बालविवाह होणाऱ्या कुटुंबाशी संवाद साधून बालविवाह न करण्याविषयी समज तयार करावी
- मुलींसोबत बोलून बालविवाहाच्या परिणामाविषयी माहिती द्यावी आणि विवाह करण्याबाबतचा निर्णय हा वय वर्षे १८ नंतर करण्याचा तिला व्यक्तीगत अधिकार आहे.
- बालविवाह होणाऱ्या कुटुंबावर अधिकाऱ्याने नजर /देखरेख ठेवली पाहिजे
- बालविवाह अधिकारी यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करावी आणि c.r.p.c. च्या कलम १५१ नुसार पोलिसांना अपराध रोखण्यासाठी अटक करण्याचे सर्वोतोपरी अधिकार आहेत
- एवढं करूनही जर कोण्या पालकांचा बालविवाह करण्याचा निर्णय ठाम असेल तर बालविवाह प्रतिबंधक कायद्याच्या कलम १३ नुसार बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्या प्रथम श्रेणी न्यायपीठा (बाल कल्याण समिती सुद्धा निर्णय देऊ शकते ) समोर तक्रार अर्ज सादर करून बालविवाह रोखण्याबाबत आदेश मिळवावेत
- अशा प्रकारची लग्न जुळवून देणाऱ्या संस्था आणि व्यक्ती यांची यादी बनवून ठेवावी`

### बालविवाहाच्या वेळी

- बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याने बालविवाह होत असल्याची तक्रार लगेचच बालविवाह प्रतिबंधक कायद्याच्या कलम १३ नुसार बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याने प्रथम श्रेणी न्यायपीठा (बाल कल्याण समिती सुद्धा निर्णय देऊ शकते ) समोर तक्रार अर्ज सादर करून बालविवाह रोखण्याबाबत आदेश मिळवावेत
- बालविवाह होत असल्याबाबत चे सबळ पुरावे जसे की, फोटो, निमंत्रण पत्रिका, लग्नाच्या खरेदी बाबतचे पुरावे आणि सर्वात महत्वाचे ती अल्पवयीन असल्याचे पुरावे गोळा करावेत
- अशा प्रकारची लग्न जुळवून देणाऱ्या संस्था आणि व्यक्ती यांची यादी बनवून ठेवावी
- पोलिसात तक्रार करून त्वरित दोषींना अटक करण्याची कार्यवाही सुरु करावी.
- जर का मुलीसोबत बालविवाह करण्याबाबत जबरदस्ती होत असल्याचे निदर्शनास आले तर मुलीला त्वरित ताब्यात घेऊन बाल न्याय मुलांची काळजी आणि संरक्षण अधिनियम २००६ नुसार कलम ३२ नुसार बाल कल्याण समिती समोर त्वरित सादर करावे (बाल कल्याण समिती जिल्ह्याच्या ठिकाणी बालगृहात आपली बैठक घेत असते.) आणि मुलीला काळजी आणि संरक्षणाची गरज असल्याचे निदर्शनास आणून बालगृहात प्रवेश मिळवून दयावा
- बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्याने मुलीचा ताबा कुणालाही देऊ नये या बाबत बाल कल्याण समिती कडे अर्ज देऊन ठेवावा

### बालविवाह-नंतर

- जर बालविवाह झाला असेल तर बालविवाह प्रतिबंधक अधिकारी विवाह दरम्यानचे आणि पूर्वीचे पुरावे गोळा करावेत
- पोलिसात तक्रार करून त्वरित दोषींना अटक करण्याची कार्यवाही सुरु करावी.
- बालविवाह होत असलेल्या घरातील स्त्रियांना अटक करता येते मात्र तुरुंगवास देता येत नाही मात्र त्यांना दंड ठोठावता येऊ शकतो. हे लक्षात असू द्या.
- मुलीला बाल कल्याण समितीसमोर सादर करावे तिला काळजी आणि संरक्षणाची गरज आहे. ती बळीत आहे हे लक्षात असू द्या.
- मुलीचा एकदा जबाब नोंदविल्यानंतर तिची पुन: पुन्हा चौकशी करू नये, हे लक्षात ठेवा वेगवेगळ्या अधिकाऱ्यांनी तिच्यासोबत संवाद करू नये
- तिची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी तिला राजी करावे आणि तिच्या सहमतीनंतरच वैद्यकीय तपासणी करावी
- तिच्यासाठी समुपदेशन आणि पुनर्वसनाची गरज लक्षात ठेऊन कार्यवाही करावी.
- मुलांच्या लैंगिक शोषणाचा कायद्याचा आधार घेत कार्यवाही करावी यासाठी आग्रह धरावा.

# माहिती मिळाल्यावर

**बालविवाह रोखण्यासाठी कोण काय भूमिका निभावणार या बाबतची कार्य प्रणाली**

## बालविवाहाची माहिती कोण देऊ शकतो-

कुणीही संवेदनशील नागरिक

कुणीही शासकीय कर्मचारी, कुणीही गावातील युवक/युवती, कोणतेही महिला मंडळ /किंवा सदस्य/बचत गटाचे सदस्य

शाळेतील मीना राजू मंच, शाळेतील कुणीही विद्यार्थी, शाळेतील शिक्षक / शिक्षिका, स्वयंसेवक, गावात काम करणारी स्वयंसेवी संस्था किंवा संस्थेचे प्रतिनिधी

## बालविवाहाची माहिती कुणाला देऊ शकतील

**गावपातळी**

ग्रामसेवक, अंगणवाडी ताई, शिक्षक, गाव बाल संरक्षण समिती, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत सदस्य

**तालुकापातळी**

गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, सुपरवायझर (अधीक्षिका), एकात्मिक बाल विकास कार्यक्रम, जवळचे पोलीस ठाणे (बाल संरक्षण अधिकारी), पंचायत समिती सदस्य

**जिल्हा पातळीवर**

बाल कल्याण समिती, शिक्षणाधिकारी, (प्राथ/माध्य) जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जिल्हा महिला आणि बालविकास अधिकारी, सभापती (महिला आणि बालविकास), उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला आणि बालविकास)

## तक्रारीची कुणी दखल घेतली नाही तर.....

जिल्हा न्यायालय, बाल कल्याण समिती, जिल्हाधिकारी.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक, जिल्हा न्यायालय.

## ग्रामसेवक

- ग्रामसेवकाने सदर माहितीची खातरजमा करावी.
- मुलीचे वय आणि त्या बाबतचे पुरावे उपलब्ध करून घ्यावेत.
- बळीत मुलीच्या कुटुंबाला भेट देऊन समज द्यावी. (या ठिकाणी ग्रामसेवकाने बालविवाह करणे कायद्याने गुन्हा आहे या बाबत सविस्तर माहिती तिच्या कुटुंबियांना आणि नातेवाईकांना द्यावी आणि त्याचा अहवाल सादर करावा.)
- मुलीच्या कुटुंबियांना समजावून सांगण्यासाठी गावातील बाल संरक्षण समिती आणि शाळा व्यवस्थापन समिती, गावातील प्रतिष्ठीत नागरिक यांचा सहभाग घ्यावा.

**कुटुंबाने लग्न थांबविण्याची तयारी दाखविल्यास....**

- गाव बाल संरक्षण समिती / शालेय व्यवस्थापन समिती किंवा जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या प्रतिनिधींच्या समक्ष लग्न थांबवीत असल्याचा कबुलीनामा लिहून घ्यावा.
- सदर कबुलीनाम्यावर जिल्हा बाल संरक्षण कक्ष बाल कल्याण समितीच्या आदेशाने देखरेख (निगराणी) करून अहवाल बाल कल्याण समितीला वेळोवेळी सादर करतील.
- सदर कबुलीनामा पोलिस यंत्रणेने घेतल्यास त्या बाबतही जिल्हा बाल संरक्षण कक्ष, बाल कल्याण समितीच्या आदेशाने देखरेख ठेवतील.
- देखरेख कालावधीत मुलीच्या संरक्षणाच्या दृष्टीने तिच्या संगोपनात हयगय होत असल्यास, बाल कल्याण समितीच्या आदेशाने मुलीचा ताबा घेऊन पुढील आदेश होई पर्यंत जिल्हा बाल संरक्षण कक्ष पालन करील.

**कुटुंबाने लग्न थांबविण्यास नकार दिल्यास......**

- ग्रामसेवक लेखी तक्रार जवळच्या पोलिस ठाण्यात दाखल करील
- (तक्रार कशी करावी याचा नमुना सोबत देण्यात येत आहे )
- सदर तक्रार दाखल करण्यासाठी गावातील गाव बाल संरक्षण समिती आणि शाळा व्यवस्थापन समिती यांची सोबत घेता येईल

## अंगणवाडी ताई

- सदर मुलीचे नाव किशोरवयीन मुलींच्या नावाच्या यादीत/गटात आहे की नाही याची खातरजमा करील.
- नाव असल्यास तिच्या वयाबाबतची माहिती पडताळून पाहिल आणि ते अठरा वर्षाच्या आतील असल्यास त्याबाबतचे पुरावे तयार ठेवील.
- नाव नसल्यास तिच्या बाबतची सर्व माहिती नव्याने गोळा करील.
- सदर बाब ग्राम सेवकाला माहित नसल्यास ती सदर बाब ग्राम सेवकाच्या निदर्शनात आणून देईल.
- ग्राम सेवकाच्या पुढील प्रक्रियेत अंगणवाडी ताई ग्रामसेवकाला सर्वतोपरी सहकार्य करील.

## पोलिस
### (बालसंरक्षण अधिकारी)

- बालविवाह होणार असल्याची लेखी /तोंडी अन्य प्रकारे माहिती मिळाल्यास
- सदर बालविवाहाची खातरजमा शासकीय कर्मचारी, शासकीय समित्या किंवा आपल्या यंत्रणेमार्फत करण्यात यावी.
- सदर कुटुंबियांना पोलिस ठाण्यात बोलावून त्यांना बालविवाह करणे कायदेशीर दखल पात्र गुन्हा असून ते तीन वर्षाच्या शिक्षेस आणि दंडास पात्र राहतील.
- बालविवाह करीत नसल्याचा लेखी कबुलीनामा कुटुंबियांकडून घेऊन पोलिस ठाण्यातील जबाबदार अधिकाऱ्याने साक्षांकित करावा. पुढील कार्यवाहीसाठी जिल्हा बाल संरक्षण खात्या कडे वर्ग करावे.
- बालविवाह झाल्याची लेखी/किंवा अन्य प्रकारे माहिती मिळाल्यास, सदर माहितीचा पाठपुरावा करून गावातील शासकीय कर्मचारी / प्रतिष्ठीत नागरिक यांचे मार्फत खातरजमा करावी.
- सदर बाबतीत मुलीच्या वयाबाबतचा आणि लग्न झाल्याचा पुरावा असणारी कागदपत्र गोळा करावीत.
- संबधित आरोपीवर बालविवाह प्रतिबंध कायद्यानुसार प्रथम खबरीचा अहवाल (FIR) घेऊन गुन्ह्याची नोंद करावी.
- या बाबतीत खालिल कलमाखाली गुन्ह्याची नोंद करवी.

1. भा.द. वि. ३६६ – A
2. POCSO Act
3. Child Marriage Prohibition Act
4. Ward and Guardian Act
5. Dowry Act

- अशा केसेस जलद गती न्यायालयात सादर कराव्यात. गरज पडल्यास पोलिसांनी Suo-Moto Action घ्यावी.

## जिल्हा बाल संरक्षण कक्ष

- जिल्हा बाल संरक्षण कक्ष बालविवाह रोखण्यासाठी जबाबदार सक्षम व्यवस्था आहे.
- जिल्हा बाल संरक्षण कक्षात आलेल्या सर्व माहिती ची खातरजमा करून पोलिस यंत्रणा आणि बाल कल्याण समिती यांच्यासोबत समन्वयाने काम करून पुढील कार्यवाही सुरु करील.
- जिल्हा बाल संरक्षण कक्ष आवश्यकतेनुसार पोलिसांना गुन्हा नोंदविण्यास सहकार्य करील.
- जिल्हा बाल संरक्षण कक्ष गाव पातळीवर बाल संरक्षण समित्यांची स्थापना करून या सर्व समित्यांची बालविवाह रोखण्यात मदत घ्यावी.
- बाल कल्याण समितीच्या आदेशाने देखरेख करण्यासाठी देण्यात आलेल्या केसेस ची माहिती संबंधित व्यवस्थेला आणि यंत्रणांना देण्यात यावी त्या बाबतचा लेखी अहवाल आपल्या दप्तरी ठेवावा.
- जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या वतीने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण कराव्यात.
- केसेस चा पाठपुरावा सगळ्या व्यवस्थांसोबत करण्याची भूमिका बाल संरक्षण समितीने घ्यावी.

## बाल कल्याण समिती

- बाल कल्याण समिती बालविवाह संदर्भात आलेल्या सर्व (लेखी/तोंडी/निनावी आणि इतर मार्गाने) येणाऱ्या सर्व तक्रारींची त्वरीत दखल घेईल.
- बाल कल्याण समिती तक्रारदार समोर न आल्यास Suo-Moto कार्यवाही करणार.
- गरज भासल्यास पोलिस यंत्रणेला summons बजावून त्यांच्या सहकार्याने मुलीच्या कुटुंबियांना समिती समोर हजार राहण्याचे आदेश देईल.
- बालविवाह होणाऱ्या मुलींचा पाठपुरावा करण्या बाबत जिल्हा बाल संरक्षण कक्षास आदेश देतील. सदर केसेस चा पाठपूरावा अहवाल लेखी स्वरुपात मागवतील.
- बाल कल्याण समिती पोलिस यंत्रणा, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, आणि जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग यांच्या सहकार्याने मुलींच्या पुनर्वसनाचे आदेश देतील.
- बाल कल्याण समिती बालविवाह रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने मोठी भूमिका घेतील.

## जिल्हा प्रशासन

- जिल्हा प्रशासन जिल्ह्यात (गाव पातळीवर) बालविवाह च्या केसेस होत असल्याची माहिती मिळाल्यावर त्वरित ग्रामसेवकाच्या सहाय्याने घटनेबाबत माहिती घेतील
- त्या गावात विशेष ग्रामसभा घेण्यात येऊन बालविवाह बाबत गावात चर्चा घडवून आणतील.
- ग्राम सेवक आणि अंगणवाडी ताई यांच्या सहकार्याने त्या कुटुंबियांना भेट देऊन त्यांच्यासोबत चर्चा करून त्यांना बालविवाह करणे किंवा करण्यास मदत करणे हा दखल पात्र गुन्हा आहे या बाबत मांडणी करून त्याचे गांभीर्य त्यांच्या निदर्शनास आणतील.
- जिल्हा प्रशासन आणि जिल्हा पातळीवरील बाल संरक्षणाची यंत्रणा (बाल कल्याण समिती, विशेष बाल संरक्षण कक्ष,पोलिस आणि महिला बाल विकास विभाग यांच्या सोबत समन्वय करून कार्यवाही करतील.

## ग्राम सेवकाने तक्रार करावयाचा अर्जाचा नमुना

**ग्रामपंचायती चे नाव (किंवा लेटरहेड )**

**दिनांकः-**

**प्रति : वरिष्ठ पोलीस निरीक्षक**

**...........पोलीस ठाणे**

विषय :- बालविवाह होत असल्याबद्दल तक्रार / बालविवाह झाल्याबद्दल तक्रार

महोदय

आज दिनांक ................रोजी आमच्या निदर्शनास आले आहे की, या ................ ग्राम पंचायतीच्या हद्दीतील ................ या गावात, श्री................ यांच्या मुलीचा विवाह होत असल्याचे / झाला असल्याचे आम्हाला समजले आहे. विवाह होणा-या / झालेल्या मुलीचे नाव................हे असून आमच्या माहितीप्रमाणे तिचे आजचे वय................ हे आहे. ( या बाबतचा पुरावा जोडीत आहोत).आणि ती या ................शाळेत आणि या ................ इयत्तेत शिकत आहे / किंवा तिने शाळा सोडली आहे. मुलीचे १८ वर्षापेक्षा कमी वय लक्षात घेता, तिच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून तिचे या वयात लग्न होणे हा बालविवाह प्रतिबंधक कायद्यांतर्गत दखलपात्र गुन्हा आहे. सबब मी / आम्ही आपल्याला या बाबत संबंधितावर कायदेशीर कार्यवाही करावी या साठी विनंती करीत आहोत.

या बाबतच्या कार्यवाहीत आपल्याला आमच्याकडून सर्वोतोपरी सहकार्य मिळेल.

आपल्या सहकार्याच्या अपेक्षेत....

आपले नम्र

ग्रामसेवकाची नाव आणि सही

**प्रतिलिपीः-**

मा. मुख्यकार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, जालना

मा. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जालना यांना देऊन उचित कार्यवाहीसाठी सादर

सदरचे पत्र जिल्हा बाल संरक्षण कक्षास सुद्धा देता येईल.

असेच पत्र गाव बाल संरक्षण समिती सुद्धा पोलिस स्टेशन आणि जिल्हा बाल संरक्षण कक्षास देऊ शकेल

## जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांचे पोलिस यांच्यासाठीचा पत्राचा नमुना

**जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे लेटरहेड**

**दिनांकः-**

**प्रति : वरिष्ठ पोलीस निरीक्षक**

**...........पोलीस ठाणे**

विषय :- बालविवाह होत असल्याबद्दल तक्रार / बालविवाह झाल्याबद्दल तक्रार

महोदय

आज दिनांक ................रोजी आमच्या निदर्शनास आले आहे की, या ................ ग्राम पंचायतीच्या हद्दीतील ................ या गावात, श्री ................ यांच्या मुलीचा विवाह होत असल्याचे / झाला असल्याचे आम्हाला समजले आहे. विवाह होणा-या / झालेल्या मुलीचे नाव ................ हे असून आमच्या माहितीप्रमाणे तिचे आजचे वय................ हे आहे. ( या बाबतचा पुरावा जोडीत आहोत). आणि ती या ................ शाळेत आणि या ................ इयत्तेत शिकत आहे / किंवा तिने शाळा सोडली आहे. मुलीचे १८ वर्षापेक्षा कमी वय लक्षात घेता, तिच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून तिचे या वयात लग्न होणे हा बालविवाह प्रतिबंधक कायद्यांतर्गत दखलपात्र गुन्हा आहे. सबब मी / आम्ही आपल्याला या बाबत संबंधितावर कायदेशीर कार्यवाही करावी या साठी विनंती करीत आहोत.

या बाबतच्या कार्यवाहीत आपल्याला आमच्याकडून सर्वोतोपरी सहकार्य मिळेल.

आपल्या सहकार्याच्या अपेक्षेत....

आपले नम्र

जिल्हा बाल संरक्षण कक्ष प्रतिनिधी (नाव आणि सही )

**प्रतिलिपीः-**

मा. पोलीस अधिक्षक, जालना

मा. राज्य बाल संरक्षण संस्था , पुणे

## जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांचे बाल कल्याण समिती यांच्यासाठीचा पत्राचा नमुना

**जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे लेटरहेड**

**दिनांकः-**

**प्रति**

**अध्यक्ष /सदस्य, बाल कल्याण समिती, जालना**

विषय :- बालविवाह होत असल्याबद्दल तक्रार / बालविवाह झाल्याबद्दल तक्रार

महोदय / महोदया

आज दिनांक ................रोजी आमच्या निदर्शनास आले आहे की, या................ ग्राम पंचायतीच्या हद्दीतील ................ या गावात, श्री................यांच्या मुलीचा विवाह होत असल्याचे / झाला असल्याचे आम्हाला समजले आहे. विवाह होणा-या / झालेल्या मुलीचे नाव................हे असून आमच्या माहितिप्रमाणे तिचे आजचे वय................ हे आहे. ( या बाबतचा पुरावा जोडीत आहोत).आणि ती या ................ शाळेत आणि या ................ इयत्तेत शिकत आहे / किंवा तिने शाळा सोडली आहे. मुलीचे १८ वर्षापेक्षा कमी वय लक्षात घेता, तिच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून तिचे या वयात लग्न होणे हा बालविवाह प्रतिबंधक कायद्यांतर्गत दखलपात्र गुन्हा आहे. सबब मी / आम्ही आपल्याला या बाबत संबंधितावर कायदेशीर कार्यवाही करावी या साठी विनंती करीत आहोत.

या बाबतच्या कार्यवाहीत आपल्याला आमच्याकडून सर्वोतोपरी सहकार्य मिळेल.

आपल्या सहकार्याच्या अपेक्षेत....

आपले नम्र

जिल्हा बाल संरक्षण कक्ष प्रतिनिधी (नाव आणि सही )

**प्रतिलिपीः-**

मा. जिल्हा महिला आणि बाल कल्याण अधिकारी, जालना

## बाल कल्याण समिती पोलिसांसाठी या नमुन्यात समन्स काढतील जिल्हा बाल कल्याण समितीचे (लेटरहेड किंवा संगणकीय पत्र)

**दिनांकः-**

**प्रति : वरिष्ठ पोलीस निरीक्षक**

**...........पोलीस ठाणे**

विषय :- बालविवाह होत असल्याबद्दल तक्रार / बालविवाह झाल्याबद्दल तक्रार

संदर्भ :- ( तक्रारीची प्रत जोडीत आहोत )

आज दिनांक ................रोजी आमच्या निदर्शनास आले आहे की, या ................ ग्राम पंचायतीच्या हद्दीतील ................ या गावात, श्री ................यांच्या मुलीचा विवाह होत असल्याचे / झाला असल्याचे आम्हाला समजले आहे. विवाह होणा-या / झालेल्या मुलीचे नाव................हे असून आमच्या माहितिप्रमाणे तिचे आजचे वय................ हे आहे. ( या बाबतचा पुरावा जोडीत आहोत).आणि ती या ................ शाळेत आणि या ................इयत्तेत शिकत आहे / किंवा तिने शाळा सोडली आहे. मुलीचे १८ वर्षापेक्षा कमी वय लक्षात घेता, तिच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून तिचे या वयात लग्न होणे हा बालविवाह प्रतिबंधक कायद्यांतर्गत दखलपात्र गुन्हा आहे. आम्ही आपल्याला या बाबत संबंधितावर कायदेशीर कार्यवाही करावी / संबंधितांवर गुन्हा दखल करावा / मुलीला आणि तिच्या कुटुंबियांना समिती समक्ष दिनांक ................या दिवशी या वेळेत ................हजर करावे या साठी आदेशित.

आपले नम्र

जिल्हा बाल कल्याण समिती (नाव आणि सही )

(बाल कल्याण समितीचे सील )

**प्रतिलिपीः-**

मा. पोलीस अधिक्षक, जालना

मा. पोलीस उप-अधिक्षक (होम), जालना

मा. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जालना यांना देऊन उचित कार्यवाहीसाठी सादर

## लग्न थांबविण्याची तयारी दाखविल्यास त्या बाबतचा नमुना

१. अध्यक्ष /सदस्य, बाल कल्याण समिती, जालना

२. वरिष्ठ पोलिस निरीक्षक, ................पोलिस ठाणे

३. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जालना

४. अध्यक्ष /सचिव, गाव बाल संरक्षण समिती, गावाचे नाव, तालुका, जालना जिल्हा

आज दिनांक................रोजी आम्ही बाल कल्याण समिती / पोलिस निरीक्षक / जिल्हा बाल संरक्षण अधिकारी / गाव बाल संरक्षण अधिकारी (पदाधिकारी) यांच्या समक्ष हजर होतो. हजर प्रतीनिधींची नावे

१................ २................

३................४,................५................

आमची मुलगी नामे................ हिचे १८ वर्षे पूर्ण होण्याअगोदर लग्न करण्याचा आम्ही निर्णय घेतला होता. या बाबत आम्हाला सदर लग्न १८ वर्षे पूर्ण होण्याच्या आत केल्यास बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ आणि इतर कायद्यान्वये असे लग्न होणे हा कायदेशीर गुन्हा ठरतो. या बाबत आम्हाला समज देण्यात आली.

आम्ही आमच्या मुलीचे लग्न पुढे ढकलण्याचा / थांबविण्याचा निर्णय घेतला असून तिचा सर्वोतोपरी सांभाळ आणि देखभाल करण्याची आमची कुटुंबियांची जबाबदारी आहे. हे आम्ही मान्य करीत असून कोणत्याही प्रकारे आमच्याकडून आमच्या मुलीला त्रास दिला गेल्यास अथवा तिच्यावर लग्नासाठी जबरदस्ती केल्यास अथवा तिच्यावर कोणत्याही प्रकारे भावनिक किंवा सामाजिक दबाव टाकण्याचा प्रयत्न केल्यास आमच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी.

आमच्या मुलीचे आम्ही तिचे वय वर्षे १८ पुर्ण झाल्या नंतरच यथोचित लग्न करून देऊ. आम्ही तिचे कोणत्याही स्वरुपात लग्न करून देण्याचा प्रयत्न केल्यास आमच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे.

या कबुलीजबाबाद्वारे आम्ही आमच्या मुलीचे स्व-खुशीने विवाह पुढे ढकलीत / थांबवीत आहोत.

सदर जबाब आम्हाला समजावून सांगण्यात आला असून आम्हाला तो मान्य आहे

समक्ष :- १. नाव :- सही :-

२. नाव :- सही :-

३. नाव :- सही :-

सक्षम अधिका-यांची सही :-

बाल कल्याण समिती (अध्यक्ष /सदस्य)

पोलिस अधिकारी (हुद्दा /नाव /सही)

जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे प्रतिनिधी

गाव बाल संरक्षण समिती सदस्य

(टीप :- सर्व सक्षम अधिकारी आपली मोहोर (शिक्का) लावतील)

**मुख्य संपादकः** प्रेरणा देशभ्रतार | **संपादकः** डॉ . अशोक कोल्हे
**सह संपादकः** नितीन थाडे | **कार्यकारी संपादकः** गजानन सुसर
**संपादकीय मंडळः** अब्दुल मुकीम देशमुख ,बशिर पटेल ,पद्माकर केंद्रे ,वर्षा पवार ,जे .बी .चव्हाण, विनायक भटकर, आनंद गांजेवार, सूर्यभान शिंदे, आर .एन .तांगडे, वाय .पी.माकु, एस .एन .चौधरी, संगिता मकरंद

ग्रामस्वराज्य हा अंक, जालना जि.प. चा असून, त्या मधील सर्व छापील मुद्रणाचे अधिकार मुख्य संपादकांनी राखून ठेवलेले आहेत.

डिझाईन: www.inhousedesign.co.in